# नागपूर हिवाळी अधिवेशन २०१३

## राज्यातील प्रमुख शहरे, संवेदनशील गर्दीची ठिकाणे येथे सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही यंत्रणा बसविणेबाबत

नागपूर (प्रतिनिधी) राज्यभरात सीसीटीव्हीच्या मदतीने संवेदनशील, गर्दीच्या महत्त्वाच्या ठिकाणावरील सेकंद व सेकंदाला घडणारी प्रत्येक हालचाल पाहणारी व जराही संशय वाटल्यास क्षणास पाऊल उचलणारी सक्षम यंत्रणा (मॉनिटरिंग सिटीम) नसल्याने संभाव्य गुन्हे, दहशतवादी कारवाया उधळून लावण्यात अपयश येत असल्याचे निदर्श नास आले आहे. मुंबई पाच पोलीस परिमंडळे व तीन उपायुक्तालये यामध्ये सीसीटीव्हीवर नियंत्रण घेण्यात स्वतंत्र नियंत्रण कक्ष नसल्याप्रकरणी त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

यावर राज्याचे गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे की, राज्यात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची कार्यवाही सुरू असून मुंबई व नाशिक येथे लवकरच ही यंत्रणा बसविण्यात येईल तसेच पुणे व पिंपरी चिंचवड शहरामध्ये याबाबत कामास सुरूवात झाली आहे. त्यामुळे संभाव्य गुन्हे दहशतवादी कारवाया उधळून लावण्यात अपयश येत आहे असे म्हणता येणार नाही. याशिवाय संभाव्य गुन्हे, दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी पोलीस दलामध्ये इतर सक्षम यंत्रणा आहेत. मुंबई शहरासाठी प्रस्तावित केलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेमध्ये ५ विभागांसाठी ५ स्वतंत्र नियंत्रण कक्ष प्रस्तावित करण्यात आले असून त्याशिवाय ३ इतर कमांड सेंटर ठेवण्यात आले आहेत.

## राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान

नागपूर (प्रतिनिधी) विदर्भात नागपूर, चंद्रपूर, भंडारा, अमरावती व यवतमाळ या जिल्हयामध्ये ऑगस्ट ते ऑक्टोबर २०१२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापूर, ज्वारी, बाजरी, मका, तीळ, उडीद व मुग या पीकांचे व घरांचे तसेच जमिनींचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. मराठवाडयातील जालना, परभणी, हिंगोली, नांदेड व लातूर जिल्ह्यात सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे २ लाख ९२ हजार हेक्टरवरील पिकांचे ५० टक्कांचे जास्त नुकसान झाले असून जिल्हा प्रशासनाने केवळ नदी, नाल्याकाठच्याच पिकांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचबरोबर ठाणे, रायगड व रत्नागिरी, सिंधुदुर्ग भागात सततच्या पावसामुळे भात शेतीचे व शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. तसेच नागपूर जिल्ह्यातील उमरेड, उपविभागात राष्ट्रीय कृषी विमा योजनेची माहिती संबंधित कार्यालयाकडून वेळेत न मिळाल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती ४८ तासात विमा कंपन्यांना कळविता आली नाही व त्यामुळे सदर शेतकरी विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहीले आहेत. याप्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणरी कार्य वाही केली अथवा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

ठाणे, रायगड व रत्नागिरी, सिंधुदुर्ग भागात सततच्या पावसामुळे भात शेतीचे व शेतजमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याची बाब खरी आहे. राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पुरए चक्रीवादळ, भुस्खलन व गारपीठ या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी नुकसान भरपाई वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून निश्चित करण्याबाबत कृषी विमा कंपनीकडून कार्यवाही केली जाते. त्यासाठी कृषी विमा कंपनीला ४८ तासात माहिती कळविणे आवश्यक असते. परंतु स्थानिक आपत्तीच्यावर नमूद केलेल्या बाबींमध्ये अतिवृष्टीचा समावेश नाही. जून ते सप्टेंबर २०१३ या कालावधीमध्ये अतिवृष्टी, पुर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येऊन पंचनामे करण्यात आले आहे. राज्यातील एकूण २७ जिल्हयात शेतपिकांचे १७ लाख ५२ हजार ५४४ हेक्टर शेतपिकांचे तर फळपिकांचे २२ जिल्हयांमध्ये ७९ हजार ४१४ हेक्टर असे एकूण १८ लाख ३१ हजार ९५८ हेक्टर क्षेत्र ५० टक्क्यांपेक्षा जस्त बाधित क्षेत्र आहे. मदत वाटपाची कार्यवाही चालू असून आत्तापर्यंत बाधित १ लाख ४५ हजार ३१७ खातेदारांना एकूण ४३७५.७८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे, असे लेखी उत्तर पुनर्वसन व मदत कार्य मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी दिले आहे.

## अलिबाग शहरानजिक चेंढरे ग्रामपंचायत हद्दीत
## एका रात्रीत बारा दुकाने फोडल्याबाबत

नागपूर (प्रतिनिधी) रायगड जिल्हयाच्या मुख्य ठिकाणी असलेल्या अलिबाग शहरानजिक चेंढरे भागात दिनांक २८ सप्टेंबर २०१३ रोजी रात्री ९ वाजल्यापासून दिनांक २९ सप्टेंबर २०१३ रोजी पहाटे ४ वाजेपर्यंत चोरटयांनी बारा दुकाने फोडून दुकानांतील मौल्यवान वस्तू व रोख रक्कम इत्यादी लंपास केल्याची घटना घडली असून या प्रकरणी पोलीसांनी घटना स्थळावर श्वान पथक तसेच ठसे तज्ज्ञांनी पहाणी केली आहे. या प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

रायगड जिल्हयाचे मुख्य ठिकाणी असलेल्या अलिबाग शहरानजिक चेंढरे भागात दिनांक २८ सप्टेंबर २०१३ रोजी रात्री ९ वाजल्यापासून दिनांक २९ सप्टेंबर २०१३ रोजी पहाटे ४ वाजेपर्यंत चोरटयांनी बारा दुकाने फोडून दुकानांतील मौल्यवान वस्तू व रोख रक्कम इत्यादी लंपास केल्याची घटना खरी असून यावाबत अलिबाग पोलीस ठाण्यात कॉ.गु.र.नं.१३६/२०१३ भादंविसं कलम ४५७, ३८०, ५११ प्रमाणे दिनांक २९ सप्टेंबर २०१३ रोजी अज्ञात चोरटयाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. घटनास्थळी श्वान पथक तसेच ठसे तज्ञांनी पाहणी केलेली आहे. तसेच अज्ञात चोरटयांचा तपास चालू केला आहे. सदर ठिकाणी सी.सी.टि.व्ही. फुटेज मिळाले असून त्याद्वारे आरोपीचा शोध घेवून आरोपी निष्पन्न होताच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे लेखी उत्तर गृह मंत्री आर.आर.पाटील यांनी दिले आहे.